# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./पोउआ/वाह/ ८९४८ /२०२३ पुणे दिनांक - १५/१२/२०२३

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, हडपसर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी पार्किंगचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**डेक्कन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **महाराष्ट्र सहकारी मुद्रनालय उत्तरेकडील गेट ते गोपाळ कृष्ण गोखले पुतळा एफ.सी. रोड पर्यंत ४० फुट असलेल्या आस्थापनेसमोरील बाजूस नो पार्कींग करण्यात येत आहे.**
- **गुप्ते हॉस्पीटल cradle,IVF ते लक्ष्मी विष्णु अपार्टमेन्ट पर्यंत दक्षिणेकडील बाजूस नो पार्कींग करण्यात येत आहे.**
- **महाराष्ट्र सहकारी मुद्रनालय पश्चिमेकडील गेट ते लाईट डि.पी. क्र. ४६११४५ पर्यंत ३० फुट रस्त्याच्या उत्तर बाजूस दुचाकी वाहनांकरीता पार्कींग तसेच लाईट डि.पी. क्र. ४६११४५ ते महाराष्ट्र को.ऑप. बँक पर्यंत ७० फुट चारचाकी वाहनांकरीता पार्कींग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – १८/१२/२०२३ ते दिनांक – 30/१२/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner